# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दिनांक १६/१२/२००३ रोजी दुपारी २.०० वाजता झालेल्या १३२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्री.के.बी. गवळी | मुख्य अधिकारी तथा उपसभापती |
| २. मा. श्री.बबनराव देशमुख | सदस्य |
| ३. मा. श्री. राजेश्वर चव्हाण | सदस्य |
| ४. मा. ॲड. श्री. जे.पी. पाटील | सदस्य |
| ५. मा. श्री.मकरंद सावे | सदस्य |
| ६. मा.श्री. विश्वास उपासे | सदस्य |
| ७. मा. सौ. शैलजा गायकवाड | सदस्या |
| ८. मा. श्री. साहेबराव खरात | सदस्य |
| ९. मा. श्री. संजय वाघचौरे | सदस्य |
| १०. मा. श्री. वामनराव राऊत | सदस्य |
| ११.मा.श्री.चांदपाशा इनामदार | सदस्य |
| १२.मा.श्री.ॲड जे.पी.पाटील | सदस्य |
| १३. मा. श्री. मोहमंद मुदस्सीर नगररचनाकार, औरंगाबाद | सदस्य प्रतिनिधी |

बैठकीचे कामकाज सुरु करण्यापुर्वी मा.मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सर्व उपस्थित मा. सदस्य यांना माहिती दिली की, मा.सभापती औरंगाबाद मंडळ यांचे दुरध्वनी संदेशानुसार ते नागपूर येथे चालु असलेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये व्यवस्त असल्यामुळे ते बैठकीस उपस्थित राहु शकणार नाही.,त्यामुळे मा.मुख्य अधिकारी तथा उपसभापती यांनी बैठक घ्यावी असे कळविले आहे. त्यानुसार व म्हाड कायदा १९७६ ,कलम २५,२६,२७ मधील तरतुदीनुसार मुख्य अधिकरी तथा उपसभापती यांचे अध्यक्षेखाली १३२ व्या बैठकीच्या कामकाजास सुरुवात झाली.

**विषय क्र १ : दिनांक २१/११/२००३ रोजी झालेल्या मंडळाच्या १३१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.**

दिनांक २१/११/२००३ रोजी झालेल्या मंडळाच्या १३१ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांविषयी सविस्तर माहिती मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास दिली. सविस्तर चर्चेअंती दिनांक २१/११/२००३ रोजीच्या १३१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत मंडळाने सर्वानुमते मान्य केला व निर्णय घेतला की,

ठराव क्र ७८७

दिनांक २१/११/२००३ रोजीझालेल्या १३१ व्या बैठकीचा कार्यववृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र २: राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमान्तर्गत सर्वे क्र ३० (भाग) ३१ (भाग) कन्नड जि. औरंगाबाद येथे अत्यल्प उत्पन्न गटातील १७० गाळे व अल्प उत्पन्न गटान्तर्गत ४७ गाळे बांधणे. निविदेवर निर्णय घेणेबाबत.

सदर विषयाच्या बाब टिप्पणीबाबत मुख्य अधिकारी औरंगाबाद यांनी मंडळास माहिती दिली की, मौजे कन्नड सर्वे क्र ३० (भाग) ३१ (भाग) येथे अत्यल्प उत्पन्न गटातील १७० गाळे व अल्प उत्पन्न गटान्तर्गत ४७ गाळे बांधण्यासाठी निविदा मागविल्या होत्या. त्यासाठी मे.लक्ष्मी कन्स्ट्रक्शन्स कंपनी यांनी अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १५.९९ टक्के कमी दराने भरलेली निविदा सर्वात निम्नतम दराची आहे. सदर निविदा १५.९९ टक्के कमी दराची असल्याने मा. मुख्य अभियंता प्राधिकरण यांनी ती स्वीकृत करण्यास सहमती दर्शविली आहे. तसेच सदर निविदा फारच कमी दराची असल्यामुळे ठेकेदाराकडुन नियमित सुरक्षा अनामत रक्कमेपेक्षा अतिरिक्त सुरक्षा रक्कम घेऊन निम्नतम निविदाधारकाच निविदा स्विकृत करण्याची शिफारस मा. मुख्य अभियंता २ प्राधिकरण यांनी केली आहे. व त्यास अनुसरुन मुख्ये लेखा अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी प्राप्त निम्नतम निविदाधारकांकडुन निविदेत नमुद केलेल्या सुरक्षा रक्कमे व्यतिरिक्त आणखी २ टक्के अतिरिक्त सुरक्षा रक्कम घेऊन निविदा स्विकृतीची शिफारस केलेली आहे.सदर निविदा स्विकारण्याचे अधिकार मंडळास असल्यामुळे उपरोक्त निविदा विचारार्थ व निर्णयार्स्तव मंडळासमोर सादर केली आहे.

याबाबत मंडळाचे सदस्य मा.डॉ श्री .डी.डी.शिंदे यांनी प्रतिपादन केले की, बाब टिप्पणीत नमुद केल्याप्रमाणे अतिरिक्त सुरक्षा ठेव घेण्याची अट टाकणेपुर्वी संबधीत निविदाधारक मे.लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनीचे प्रोप्रेटर यांना समक्ष बोलावुन त्यांचे मत घेणे योग्य राहील असे प्रस्तावित केले. यास सर्व सन्माननीय सदस्यांनी सहमती दर्शविली असता सदर ठेकेदारास बैठकीस बोलविण्यांत आले. बैठकीत सर्व सदस्यांमार्फत मा. सदस्य श्री.शिंदे यांनी सदर ठेकेदारास अतिरिक्त सुरक्षा ठेव २ टक्के प्रस्तावित असुन याबाबत विचारणा करण्यांत आली. त्यावेळी सदरठेकेदाराने संबंधीत निविदेमध्ये तशी तरतुद नसल्याने व मंडळाध्ये यापुर्वी केलेल्याकामाचा अनुभव लक्षात घेता अतिरिक्त सुरक्षा ठेव न लावता निविदा मंजूर करावी अशी विनंती केली. व तसे लेखी कळविले.

याबाबत मुख्य अधिकारी यांनी पुन्हा स्पष्ट केले की, मा.मुख्य अभियंता प्राधिकरण यांनी सुचविल्याप्रमाणे प्रस्तावित २ टक्के अतिरिक्त सुरक्षा रक्कम जमा करणेच्या अटीवरच प्रस्तुत निविदा मंजूर करणे याग्य राहील. तथापी याबाबत मा.सदस्य श्री.शिंदे यांनी असे प्रतिपादन केले की, संबंधीत ठेकेदाराने अतिरिक्त सुरक्षा रक्कम देण्याचे नाकारले असल्यामुळे त्या आधारे त्यांची निविदा नामंजूर केल्यास फेर निविदेसाठी बराच विलंब होईल तसेच फेरनिविदेमध्ये जास्तीचे दर आल्यास अडचणीचे होईल तेंव्हा अगोदरच विलंब झालेले सदरील काम लवकर सुरु करण्याचे दृष्टीने व त्यांनी पुर्वी केलेले म्हाडाचे काम विचारात घेता अतिरिक्त सुरक्षा रक्कमेशिवाय त्यांची निविदा मंजूर करणे संयुत्तीक होईल.

यावर मंडळाचे सर्व मा. सदस्य यांनी सर्वानुमते सांगितले की, उपरोक्त कामांचया निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १५.९९ टक्के कमी दराची आहे. तसेच ठेकेदाराच्या मंडळान्तर्गत केलेल्याबांधकामाचा पुर्वानुभव लक्षात घेता त्याचेकडुन अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम न

आकारता निविदेतील मुळ तरतुदीप्रमाणे सुरक्षा ठेव रक्कम आकारुन त्यांच निविदा मंजूर करण्यास हरकत नाही.

उपरोक्त चर्चेअंती मंडळाने सर्वानुमते निर्णय घेतला की,

ठराव क्र ७८८

राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमान्तर्गत सर्वे क्र ३० (भाग) ३१ (भाग) कन्नड जि. औरंगाबाद येथे अत्यल्प उत्पन्न गटातील १७० गाळे व अल्प उत्पन्न गटान्तर्गत ४७ गाळे बांधणेसाठी मे.लक्ष्मी कन्स्ट्रक्शन्स कंपनी यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १५.९९ टक्के कमी दराची सर्वात निम्नतम निविदा अतिरिक्त सुरक्षा ठेव न आकारता मंजूर करण्यांत येत आहे.

सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी व, याबाबतचा अहवाल मा. मुख्य अभियंता प्राधिकरण यांना सादर करावा.

उपरोक्त प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर सभेच्या अध्यक्षांच्या परवानगीने मा. सदस्यांनी खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित केले.

१. मा. सदस्य श्री. इनामदार व मा. श्री.सावे यांनी प्रतिपादन केले की, लातूर येथे मंडळाच्याविभागीय कार्यालयास जागा भाडयाने घ्यावयाची आहे ती मंडळाचे स्थानिकसदस्य यांचे सहमतीने घेण्यात यावी. म्हणजे मंडळास योग्य जागा भाडयाने मिळु शकेल.मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, जागा भाडयाने घेण्याच्या बाबतीत मंडळाचे स्थानिक सदस्य यांचे सहमतीने प्रस्ताव सादर करण्यासाठी कार्यकारी अभियंता लातूर यांना सूचना देण्यांत येतील.
२. मा.सदस्य श्री.इनामदार यांनी प्रतिपादन केले की, लेबर कॉलनी लातूर येथे मंडळाचे दोन भूखंड रिक्त आहेत. त्यांचे वाटपासाठी जाहिरात द्यावी.याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सदर भूखडांच्या सदयस्थितीबाबत कार्यकारी अभियंता लातूर यांचेकडुन अहवाल मागविण्यांत येईल. व त्यानंतर भूखंडाच्या विक्रीसाठी जाहिरात देण्याची कार्यवाही करण्यांत येईल.
३. मौ.नरसी जि. नांदेड व पैठण जि. औरंगाबाद येथील गाळयांसाठी जाहिरात लवकरात लवकर देण्यासाठी मंडळाचे मा.सदस्य श्री.पाटील व मा. श्री. वाधचौरे यांनी सांगितले. सदर ठिकाणी मागणी आजमाविण्यासाठी जाहिराती देण्याची कार्यवाही त्वरीत करावी अशा सुचना मुख्य अधिकारी यांनी मिळकत व्यवस्थापक यांना बैठकीत दिल्या.

शेवटी श्री.आर.के.पाटील उपअभियंता यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त झाल्याचे घोषीत केली.